(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – IV ISSN 2277-8063

# पश्चिम महाराष्ट्रातील धनगर समाजातील राजकीय नेतृत्वाच एक अभ्यास

**श्री.दिपक संभाजी माने** संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा.डॉ. विजय विष्णू पाडळकर** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग कोल्हापूर चंद्राबाई-शांतप्पा शेंदुरे कॉलेज,हुपरी

---

**प्रस्तावना :**

प्रत्येक समाजाला स्वतःची अशी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. ज्ञान, श्रद्धा, मूल्ये व नियमने,भाषा, प्रतीके असे संस्कृतीचे घटक असतात. त्या त्या कळात समाजाने आदर्श मानलेले वर्तन प्रकार हीसंस्कृतीचे भाग मानले जातातमात्र संस्कृतीतल्या सर्व बाबी व्यक्तीला आनुवंशिकतेनुसार प्राप्त होत नाहीत,तर व्यक्तीला त्या शिकून घ्याव्या लागतात. ज्ञान, कौशल्ये, प्रवृत्ती या सर्व बाबी शिकून घेऊन त्या आत्मसातकरण्याच्या प्रक्रियेला सामाजिकरण म्हणतात. या प्रक्रियेत व्यक्तीला ज्या समाजात आपले संपूर्ण जीवनजगावयाचे आहे त्याची ओळख होते. समाजाचे सातत्य स्थैर्य, समाजातील व्यवस्था, व्यक्तींच्या वर्तनावरीलनियंत्रण, संस्कृतीचे संक्रमण या संपूर्ण समाजाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टी सामाजिकरणाच्या प्रक्रियेमुळेचसाध्य होतात. यातून नेतृत्व निर्माण होत असते. असे नेतृत्व समाजाच्या विकासासाठी आवश्यक असते. या नेतृत्वाचा धनगर समाजाच्या अनुषंगाने प्रस्तुत लेखात विवेचन केले आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील धनगर समाजातील राजकीय नेतृत्वाची मांडणी केली आहे.

**राजकीय नेतृत्व :**

'नेतृत्व' व 'राजकीय' या दोन्ही संकल्पनांचा वेगवेगळा विचार केला. तरी राजकीय या व्यापक संज्ञेमुळे नेतृत्व या संकल्पनेला एक वेगळी दिशा प्राप्त झाली आहे. नेतृत्व हे राजकीय आहे अथवा गैर राजकीय आहे असा स्पष्टपणे फरक करणे सोपे नाही. कित्येक वेळा आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रातील व्यक्तींना निवडणुकीत उभे राहण्यासाठी राजकीय पक्षांची तिकिटे (उमेदवारी) मिळतात. त्यांच्या क्षेत्रातील लोकप्रियतेमुळे ते निवडून येतात व ते राजकीय नेतृत्व (पुढारी) बनतात. यावरुन नेता अथवा पुढारी हा शब्द सर्वसामान्य अर्थाने 'राजकीय नेतृत्वासाठी' वापरला जातो. 'नेतृत्व' ही संज्ञा देखील अपरिमित आहे. कारण प्राचीन काळामधल्या राजापासून तर वर्तमान काळातील राजनेत्यापर्यंत सर्वांचा यामध्ये समावेश होतो.[१]ख्यातनाम लेखक व द लीडरशिप इन्स्टिट्यूट ऑफ युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियाचे संस्थापक-अध्यक्ष वॉरन बेनिस यांच्या मते एखादं स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याची क्षमता म्हणजे नेतृत्वहोय"[२]

या प्रकारे नेतृत्व या संकल्पना बद्दल एकमत नाही "नेतृत्व महान मानव किंवा अवतारधारी नसते, नेतृत्वामध्ये मैत्रीपूर्ण वाटाघाटी, तीव्र राजकीय संघर्ष, हितसंबंधाचे दावे, अस्मितांचे विविध रंग, सत्तावाटपाच्या नि;पक्षपाती वाटाघाटी, अनुयायांच्या संघटनासाठी लक्षवेधक कार्यक्रम, सत्तेचा तीव्र संघर्ष असतो."[३]

काळात लोकशाही शासन व्यवस्थेत नेतृत्व हे अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहे. म्हणूनच शाळा, महाविद्यालय व सर्व स्तरातून नेतृत्वाचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळ्या संघटनेच्या माध्यमातून नेतृत्व निर्माण होत आहे. नेता हा समाजाचा व समाजघटकांचा प्रतिक असतो. ज्या समाज घटकामधून नेतृत्वाचा विकास झाला त्या नेत्याच्या मनोवृत्तीचा, प्रगतीचा आणिविचारसरणीचा प्रभाव पडत असतो. ज्या समाजात जेवढा नेतृत्वाचा विकास होतो तो समाज तेवढा प्रगत समजला जातो. ज्या समाजात नेतृत्वाचा अभाव असतो तो समाज विकासाच्या बाबतीत अप्रगत असतो. म्हणून समाज विकासासाठी त्या समाजात नेतृत्वाचा विकास होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने धनगर समाजाच्या विकासाठी राजकीय नेतृत्व अभे राहिलेले. या राजकीय नेतुत्व निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाही व्यवस्थेत आपल्या समाजाचे नेतृत्व करत असतो.

**पश्चिम महाराष्ट्रातील धनगर समाजातील नेतृत्व :**

**भानुदास कृष्णा पडळकर :**

गोवा मुक्ती चळवळ व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग घेतलेले नेतृत्व होते. यावरून पडळकर यांचे नेतृत्व व्यापक भूमिका घेणारे होते. १९६० साली पडळकरांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत आरंभी नोकरी केली. शिक्षक पदाचा राजीनामा देऊन त्यांनी महाराणी देवी अहिल्याबाई होळकर शिक्षण संस्था स्थापना केली (झरे, ता. आटपाडी; पेड, ता. तासगांव). तसेच त्यांनी धनगर समाजोन्नती मंडळ स्थापना केली. धनगर समाजाला संघटीत करण्यासाठी पडळकर यांनी धनगर समाजातील सास्कृतिक घटकाचा आधार घेतला. त्यांनी 'सुंबरानं मांडिलं या नावाखाली ओव्यांची स्पर्धा सांगली येथे घेतली होती. तसेच सुंबरान मांडिल हे मासिक समाज प्रबोधनासाठी सुरू केले होते. वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, वि. स. पागे आणि तेव्हाचे जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब कोरे यांना ओव्यांच्या कार्यक्रमास व मेळाव्यास आणले होते (१९६५). या बरोबरच पडळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. थोडक्यात पडळकर उच्च जातीच्या बाहेर जाऊन धनगर समाजाचे संघटन करत होते. धनगर व नवबौद्ध यांना एकत्र आणण्याचे त्यांनी प्रयत्न केले. ब्राह्मण, मराठा, लिंगायत यांना विरोध न करता या जाती गटातील नेत्यांच्या मदतीनेच समाजाचे संघटन करण्याची रणनीती पडळकरांनी आरंभी राबविली होती. धनगर समाजाचे राजकीय व आर्थिक हितसंबंध पुढे रेटण्यासाठी मोर्चा व आंदोलने या मार्गांचा वापर केला.[४]

**बी.के. कोकरे :**

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील कोकरेवाडी या छोट्याशा गावात सर्वसामान्य कुटूंबात खंडेराव कोकरे व जिजाई कोकरे यांच्यापोटी १ जून १९६० रोजी बापुरावांचा जन्म झाला.४३ बी.के. कोकरे हे हुशार व जिद्दी होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण उंडवबडी येथे झाले. तर उच्च शिक्षणासाठी मुंबईतील आय.सी.टी. अभियांत्रिकी अँटोनॉमस कॉलेजमध्ये झाले. त्यांना उच्च शिक्षणात सुवर्ण पदक प्राप्त झाले होते. शिक्षणानंतर सातारा येथे त्यांनी आपली प्राध्यापकाची नोकरी सुरु केली. येथे त्यांना धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश असून देखील धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळत नसल्याचे जाणवून आले. येथूनच त्यांच्या राजकीय चळवळीला सुरुवात झाली. त्यांनी सवलतीच्या मागणीसाठी तहसिल ऑफिस समोर आंदोलने केले. या नंतर त्यांनी धनगर समाजाला हक्क मिळवून देण्याचा त्यांनी ध्यास आरंभला त्यानुसार कार्य सुरु केले.या कार्याच्या दरम्यान ना.स. इनामदार लिखित महाराजा यशवंतराव होळकर यांच्या जीवनावर 'झुंज' या कादंबरीचे वाचन केले. त्यातून त्यांना प्रेरणा मिळाली. "धनगर समाज जागृतीचे कार्य हाती घेतले. परंतु म्हणावा तसा त्यांना प्रतिसाद समाजातून मिळत नव्हता. तेव्हा त्यांनी समाजातील लोकांना इंदोरला नेऊन होळकर साम्राज्याचा इतिहास दाखवून त्यांच्यातील स्वाभीमान जागृत करण्याचे कार्य केले."[५]

यावेळी बी.के. कोकरे यांना शिक्षणाच्या जोरावर परदेशात जावून लाखो रुपये कमावयची त्यांना संधी होती पण शिक्षण घेत असताना बसलेले आर्थिक चटके आणि सामाजिक अवहेलना पुढच्या पिढीच्या वाट्याला येऊ नये म्हणून १ एप्रील १९८९ रोजी यशवंत सेने ही संघटनेची उभारणी केली. याची पहिली शाखा दुधेवाडी, ता. पलटण जि. सातारा या ठिकाणी झाली. त्यांनी जुनी दुचाकी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर संघटनेचा उद्देश लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी महाराष्ट्रभर दौरे केले. आरक्षणामुळं सामाजिक, आर्थिक स्तर सुधारतो याची कल्पना देखील निरक्षरतेमुळं धनगर समाजाला नव्हती. सलग दहा वर्षे त्यांनी दौरे केले, यशवंत सेना महाराष्ट्रात रुजवली, वाढवली. त्यांच्या या प्रयत्नातून धनगर समाजाला आंदोलनाची पार्श्वभूमी तयार केली. १९९० साली धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणवर यासाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलकांनी खंबाटकीच्या घाटात भव्य रास्ता रोको केला. "महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वात मोठा रास्तारोको होता. या जनआंदोलनाचा परिणाम म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवारांना याची दखल घ्यावी लागली. सन १९९१ मध्ये धनगर समाजातील माजी मंत्री स्व. शिवाजी (बापु) शेंडगे यांना हाताशी धरुन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या उपस्थितीत धनगर समाजाला भटक्या जमातीच्या चे आरक्षण लागू करुन तोंडाला पाने पुसली व धनगर समाजाच्या मुळ मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.[६]

या प्रकारे धनगरांची नाराजी परवडण्यासारखी नाही. ही गोष्ट पवारांना माहिती होती. पवारांनी या आंदोलनाला शांत करण्यासाठी अनेक उपाय योजना योजायला सुरुवात केली. धनगरांना एसटीत आरक्षण देण्यासाठी पवारांनी त्यावेळी पुढाकार घेतला असता तर मागणी सहजमान्य झाली असती. समाजाची परिस्थीती बदलली असती. असे समाजातील नागरिकांचे म्हणने होते. पण तरी पवारांनी एसटीत आरक्षण न देता एनटी प्रवर्गात धनगरांना आरक्षण दिले. या मागे पवारांचा काही राजकीय हेतू होता का? अशाही शंका काहीजण उपस्थित करतात. एसटी आरक्षणामुळं पश्चिम महाराष्ट्रातले मतदार संघ आरक्षित होतील आणि पवारांच्या मर्जीतल्या लोकांना त्यांचे विधानसभा लोकसभा मतदार संघ सोडावे लागतील.म्हणून त्यांचा एसटी आरक्षणाला विरोध होता, असा एक प्रवाद यशवंत सेनेच्या कार्यकर्त्यांकडून केला जातो. कारण एनटी प्रवर्गासाठी राजकीय आरक्षण नाही, त्यामुळं धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षणाची मागणी असतानाही पवारांनी एनटी प्रवर्गात आरक्षण दिले.असा एक विचार प्रवाह धनगर समाजात आहे.

धनगर आंदोलनाचे नेतृत्व स्वतः बी.के. कोकरे करत होते. त्यांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत होता. बी.के. कोकरेंशी वाटाघाटी करणे शक्य नव्हते, कारण ते एसटी आरक्षणाची मागणी करत होते. म्हणून पवारांनी धनगर समाजातील मुंबईत राहणाऱ्या आणि राजकारणाशी या आधी संबंध नसलेल्या शिवाजीराव शेंडगे निवडून आले आणि त्यांना धनगरांचे प्रतिनिधी म्हणून घोषित करत एनटीच आरक्षण घ्यायला लावले, असं यशवंत सेनेत काम केलेल्या जुन्या कार्यकर्त्याचे म्हणणे आहे.[७]

अशा प्रकारे एसटी प्रवर्गासाठी आक्रमक आंदोलन करणाऱ्या धनगर समाजाला त्यांना एसटी प्रवर्गात आरक्षण मिळू शकते याची कल्पनाही नव्हती. गावकुसाबाहेर राहणारा धनगर समाज न कोणत्या आंदोलनात सहभाग घ्यायचा न मुलभूत हक्कांबद्दल त्यांना जागृती होती. पण अशा प्रतिकूल परिस्थीतीत धनगर समाजात जागृती करण्याचं काम बी.के कोकरे अर्थात बापूसाहेब कोकरे यांनी केले. त्यामुळे ते धनगर आरक्षण चळवळीचे जनक आहेत.[८]

**शिवाजीराव शेंडगे :**

सर्वसामान्य कुटूंबात जन्मलेला, आपल्या स्वकर्तृत्वावर मंत्रीपदापर्यंत पोहचलेले शिवाजीराव शेंडगे हे धनगर समाजातील एक महत्वाचे नेतृत्व होते. करेवाडी सारख्या दुष्काळी भागातील खेड्यात त्यांचा जन्म झाला. उत्तम संघटनकौशल्य, मधुरवाणी, साधी राहणी, सर्वांसोबत मिळून मिसळून राहण्याचा स्वभाव, अडी अडणीला धाऊन जाण्याची वृत्ती हे उपजत गुण त्यांच्या अंगी होते. खेडेगांबातून मुंबईत रोजीरोजीसाठी गेले. तेथे असुरक्षित आणि असंघटीत कामगारांना एकत्र केले. त्यांच्या लाभ हक्कासाठी आंदोलने केली. त्यावेळचे प्रसिध्द कामगार नेते आणि कॉंग्रेसचे नेते श्री मनोहर कोतवाल यांनी शिवाजीरावांच्या अंगातील गुणांची पारख केली आणि त्यांच्याकडे कामगाराचे संघटन सोपविले. या संधीचे सोने करुन शिवाजीरावांनी आपला जम बसविला. तमाम कामगारांना एकत्र केले. त्यांचे हक्क कर्तव्य यांची जाणीव करुन दिली व आपले नेतृत्व सिध्द केले. हे करत असतांना त्यांची नाळ त्यांच्या गावाकडे होती. कवठेमहाकाळ, आरेवाडी, सारख्या दुष्काळी पट्टयातील अनेक तरुणांना त्यांच्या हाताला काम दिले. मुंबईतील गोदीत

यांच्यावर प्रेम करणारे असंख्य कामगार कार्यक्त निर्माण झाले. स्व. राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली देशभरात काँग्रेसपक्ष लोकांसमोर विविध विकासाचा कार्यक्रम घेवून जात होता. त्याच क्षणी बापुंनी काँग्रेस पक्षाच्या तिकोटावर निवडणूक लढविण्याचे ठरविले. पैसा, संपत्ती, माणसांचे मोठे पाळबळ, मुंबईतील जनसंपर्क पाहता ते मुंबईत सहज विजयी झाले असते किंवा विधानपरिषदेवर गेले असते. परंतु असे न करता त्यांनी स्वत:च्या दुष्काळी भागातून निवडणुक लढविण्याचे ठरविले. आणि काँग्रेस पक्षाने त्यांना उमेदवारी दिली. १९९० च्या विधानसभा विवडणुकीत ते कवठेमहाकाळ मतदार संघातून निवडून आले.[९]

**अण्णासाहेब डांगे :**

श्री मारुती शिणगारे व सौ. येसाबाई शिणगारे यांच्या पोटी अण्णा डांगे यांचा जन्म दिनांक ३० जून १९३३ रोजी (आषाढ शु. एकादशी) कोडोलीत वारणा नगर जिल्हा कोल्हापूर येथे झाला.४९ आयुष्याच्या सुरुवातीलाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून राष्ट्रभक्तीचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. अण्णा डांगे १९४७ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जात होते. पुढे त्यांनी शाखा मंडळाची जबाबदारी घेतली. जनसंघाची स्थापना झाल्यानंतर सांगली जिल्हा अध्यक्षपदावर त्यांनी कार्य केले. पुढे आणीबाणीच्या काळात त्यांनी १५ महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगली होती. भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेनंतर सांगली जिल्ह्याचे अध्यक्ष व नंतर महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे सचिवपदही त्यांनी भुषविले. एक कार्यकर्ता ते नेता म्हणून त्यांनी आपल्या कार्याची छाप पडली. सन १९७९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते राज्याच्या राजकारणात सक्रीय झाले. महाराष्ट्राच्या सत्तेवर काँग्रेस पक्ष असतांना त्यांना विधानपरिषदेत विरोधीपक्ष नेता म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. या संधीचे सोने करत त्यांनी काँग्रेस पक्षावर टिका करुन त्यांची भ्रष्टकार्य सभागृहाच्या माध्यमातून जनतेसमोर मांडले व पक्षाची ध्येय धोरणे जनतेला पटवून दिले. परिणामी १९९५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर युतीचे सरकार सत्तेवर आले. यामध्ये अण्णा डांगे यांचे योगदान महत्वाचे आहे. १९८४ साली महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य म्हणून त्यांची निवड झाली.[१०]

पुढे १८ वर्ष त्यांनी सदस्य म्हणून कार्य केले. या काळात त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रश्नांना वाचा फोडली. लक्षवेधी सूचना, वेगवेगळे ठराव, स्थगन प्रस्ताव, वेगवेगळ्या चर्चेच्या माध्यमातून विविध प्रश्न सभागृहात उपस्थित केले. सरकारला त्यावर कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा केला. १९९० पर्यंत धनगर समाजाचा समावेश शासनाच्या यादीत इतर मागासवर्गीय (०८६) मध्ये होता. परंतु धनगरांचा समावेश हा अनुसूचित जमातीत करावा ह्या मागणीसाठी अण्णा डांगे यांनी टक्कर मोर्चा काढला. १९९२ मध्ये जेजूरी या ठिकाणी धनगर समाज संघटीत करण्यासाठी धनगर समाज महासंघाची स्थापना केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे धनगर समाजाची अस्मिता जागी होऊन समाज संघटीत झाला. धनगरांच्या विकासासाठी त्यांचा समावेश भटक्या विमुक्त जातीमध्ये करावा ही मागणी अण्णा डांगे यांनी सभागृहात केली. परिणामी मे १९९० शड्ड मध्ये शासनाने तसा निर्णय घेतला. परंतु शासनाच्या आदेशात राहिलेल्या उणिवा दूर करुन घेण्यासाठी अण्णा डांगे यांनी पुढील काळात शासनाशी संघर्ष चालूच ठेवला. धनगरांच्या अनेक मागण्यांचा त्यांनी पाठपुरावा केला. धनगरांना शेळ्या-मेंढ्या घेण्यासाठी शासनाने कमी व्याजदरात कर्ज द्यावे, सावकारापासून धनगरांचे संरक्षण करावे, भटक्यांच्या आरक्षणाचा टक्का वाढवावा यासारख्या अनेक मागण्या त्यांनी सरकार दरबारी केल्याचे दिसून येते. मा. अण्णा डांगे यांनी १९७१ साली जनसंघाच्या तिकोटावर सांगली मतदार संघातून लोकसभा निवडणुक लढवली. पुढे १९८९ आणि १९९८ मध्ये भाजपाच्या तिकोटावर लोकसभेच्या रिंगणात उतरले. परंतु या दोन्हीवेळी त्यांचा थोड्या मताने पराभव झाला. १९९५ ते १९९९ या काळात महाराष्ट्रात युतीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी अण्णासाहेब डांगे यांना ग्रामविकास मंत्रीपद मिळाले. मुळातच ग्रामीण चेहरा व ग्रामीण भागाशी असलेली त्यांची नाळ यामुळे त्यांना हे खाते देण्यात आले. या मंत्रीमंडळाच्या काळात त्यांनी अनेक महत्वर्पूण निर्णय घेतले. यामध्ये अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वशासन करण्याच्या दृष्टीने अधिकार प्रदान करणारे सुधारणा विधेयक ७३ व्या घटना दुरुस्तीनूसार अनुसूचित क्षेत्रातील माडा आणि मिनी माडा क्षेत्रांना सवलती मिळणे, किमान विद्यार्थी संख्येबर आधारीत शिक्षकांच पदे भरणे, सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी कृष्णा खोरे, विदर्भ खोरे, गोदावरी खोरे, आणि तापी खोरे आदींची स्थापना करण्यात आली. मुंबई ग्रामपंचायत सुधारणा विधेयक, ग्राम सडक योजना यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करुन ९ हजार ३२१ गावे पक्क्या रस्त्याशी जोडले. यासारखे ग्रामीण विकासाला चालना देणारे निर्णय त्यांनी घेतले.

महाराष्ट्राच्या राजकारणात बहुजनांना एकत्र करण्यासाठी माधव म्हणजे माळी, धनगर व वंजारी हा फार्मुला निर्माण करण्याचा प्रयत्न गोपीनाथराव मुंढे, अण्णासाहेब डोंगे ब छगन भुजबळ यांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पुढे अण्णासाहेब डांगे यांनी धनगर समाज महासंघ, मल्हार सेना, लोकराज्य पार्टीची स्थापना करुन धनगर समाज एकत्र करण्याचा प्रयत्न केला व २००४ वर्षीच्या लोकसभा निवडणुका लढवल्या पण मतदारांनी त्यांच्या पक्षाला म्हणावी तशी साथ दिली नाही. त्यामुळे पुढे अण्णा डांगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करुन लोकराज्य पार्टीचे विलीनीकरण केले. मा. अण्णा डांगे यांच्या १८ वर्षाच्याराजकीय कार्याचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, आदिवासींचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळाचे प्रश्न, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद, जातीय दंगली, कायदा आणि सुव्यवस्था या सारख्या प्रश्नांचा सातत्याने सभागृहात पाठपुरावा केला. शासनाला निर्णय घेण्यास भाग पाडले. अण्णासाहेब डांगे यांनी अहिल्याबाईचे जन्मगाव शोधून काढले. त्याला तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून दिला. त्या ठिकाणी अनेक विकासाची कामे केली व पर्यटनस्थळ म्हणून नावारुपास आणले. अण्णासाहेब डांगे यांचे कार्य चोफेरे होते. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. उत्तम राजकीय वक्ता म्हणून २००१ साली कॉमनववेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन महाराष्ट्र शाखेचा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार, शिक्षण क्षेत्रातील कामगिरीमुळे

२०१० सालचा इंडियन इकॉनॉमिक डेव्हलेपमेंट अँण्ड रिसर्च असोसिएशन, नवी दिल्ली या संस्थेमार्फत इंडियन लीडरशीप अवार्ड फॉर रिसर्च असोसिएशन नबी दिल्ली या संस्थेतर्फे लीडरशीप अवार्ड फार एज्यूकेशन एक्सलन्स पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलतीची अंमलबजावणी व्हावी यासाठी श्री अण्णा डांगे यांनी दि. ३ डिसेंबर २००८ रोजी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर टक्कर मोर्चा काढून आपले कपाळ भिंतीवर हानून रक्तबंबाळ केले होते. त्या अवस्थेत जिल्हाधिकाऱ्याला निवेदन देऊन उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. वयाच्या ७२व्या वर्षी समाजासाठी संघर्ष करणारा हा नेता आजही आपला संघर्ष चालू ठेवतांना दिसतो.[११]

**आनंदराव देवकते :**

महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस पक्षाची एकनिष्ठपणे सेवा करणाऱ्यांपैकी एक म्हणजे आनंदराव देवकते ओळखले जातात. आनंदराव देवकते यांच्या राजकारणाची सुरुवात त्यांच्या गावचे म्हणजे राजूरचे सरपंच (१९६२-१९७३) पासून होते. ते राज्याच्या मंत्रीपदापर्यंत पोहचतात. १९५५ मध्ये गोवामुक्ती संग्रामात त्यांनी सहभाग घेतला होता. देशसेवा, देशप्रेम हे त्यांचे गुण तेंव्हापासून पाहावयास मिळतात. १९६०-६४ मध्ये त्यांनी कॉगेसचे सचिव म्हूणन कार्य केले. १९६४-७० या कालखंडात ते सोलापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँकेचे संचालक होते. १९६७-७७ या कालखंडात ते सोलापूर जिल्हापरिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले.१९७२-७७ मध्ये दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे उपसभापती म्हणून कार्य केले. १९८३-८६ या काळात ते महाराष्ट्र राज्य सहकारी भू-विकास बँक मुंबईचे चेअरमन होते. १९८९ते १९९८ मध्ये ते पंचायतराज्य समितीचे अध्यक्ष होते. १९८८-८९ मध्ये श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना कुमठे (सोलापूर) चे संचालक होते. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत ते काँग्रेस (आय) पक्षाकडून सोलापूर (प.) मतदार संघातून निवडून आले होते. तेंव्हापासून त्यांनी २५ वर्ष या मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. सन १९८५ ते १९९०, १९९० ते १९९५, १९९५ ते १९९९ आणि १९९९ ते २००९ या कालखंडात सोलापूर (प.) मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले. १९९९ ते २००३ या कालखंडात त्यानी राज्याचे दुग्धविकास मंत्री म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटविला.[८]२००३ मध्ये काँग्रेस पक्षाने विलासराव देशमुख यांना मुख्यमंत्रीपदावरुन दुर करुन मुख्यमंत्री पदाची जबाबदारी सुशिलकुमार शिंदे यांच्यावर सोपवली. तेंव्हा आनंदराव देवकते यांनी सुशिलकुमार शिंदे यांच्यासाठी आमदार व मंत्रीपदाचा राजीनामा दिला व हा मतदारसंघ सुशिलकुमार शिंदेसाठी सोडला. सुशिलकुमार शिंदे यांनी खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर देवकते यांना उमेदवारी दिली. मात्र या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. तो त्यांच्या जिव्हारी लागल्यामुळे त्यांच्या राजकरणाला उतरती कळा लागली. मात्र देवकते यांची पक्षनिष्ठा ढळली नाही. अशा या नेतृत्वाचा अस्त (निधन) १२ ऑक्टोबर २०१८ रोजी झाला.[१२]

**महादेव जगन्नाथ जानकर :**

गाढ झोपलेल्या धनगर समाजाला जागविण्याचे व संघटीत करण्याचे महान कार्य महादेव जानकर यांनी केले. अनेक पोटजातीत, भेदाभेदात हा समाज विखुरला गेला होता. या विखुरलेल्या समाजाला एकत्र करुन त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य महादेव जानकरांनी केले. एक तरुण मोठ्या पगाराची नोकरी सोडतो. समाजकार्यासाठी लग्न करणार नाही, घरी जाणार नाही, बँकेत स्वत:चे खाते काढणार नाही अशी प्रतिज्ञा घेऊन समाज जागृतीचे कार्य करतो. अशी त्यांची समाजात प्रतिमा निर्माण झाली होती. लाखोंच्या संख्येने लोक जानकाराभोवती एकत्र येऊ लागले. पाहता पाहता महादेव जानकर लोकनेते म्हणून समाजमान्य झाले. महादेव जानकर यांचा जन्म दि. १९ एप्रिल १९६८ रोजी पळसवबाडे ता. माण, जि. सातारा या ठिकाणी झाला. त्यांच्या आईचे नाव गुणाबाई तर वडीलांचे नाव जगन्नाथ होते. महादेव जानकरांचे वडील मेंढरे राखण्याचे काम करत. कुटूंबाची आर्थिक परिस्थिती बेताची होती. परंतु एखादया तरी मुलाला शिकवावे म्हणून महादेवाला शिकवलं. लहानपणापासून चाणाक्ष बुध्दीचा विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात होते. आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर त्यांनी सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. अभियांत्रिकी शिक्षण घेतले तरी त्यांचा पिंड हा सामाजिक इंजिनिअरींग करण्याचा होता. त्यामुळे ते सुरुवातीपासून समाजाशी जोडलेले होते. समाजातील अज्ञानी लोकांना शिक्षणाचे महत्व ते पटवून देत. वेळ पडली तर मेंढरं विका पण लेकराला शिकवा हा मंत्र त्यांनी दिला होता. तरुणपणी ते बहुजन समाज पक्षाचे नेते काशिराम यांच्याकडे आकर्षित झाले. बहुजनांचा विकास करण्यासाठी त्यांनी महात्मा फुलेंच्या विचारांचा स्वीकार करून त्या दृष्टीने ते वाटचाल करु लागले. कॉलेजमध्ये असतांनाच जवळपास १९८८ पासून सामाजिक कार्याला सुरुवात केली. वालचंद कॉलेज मध्ये ते कॉलेज प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवडून आले. आणि येथूनच त्यांच्या राजकारणाला सुरुवात झाली. याच काळात सन १९८८ ला सातारा येथे प्रा. बापुसाहेब कोकरे यांनी यशवंत सेनेची स्थापना केली होती. या संघटनेच्या माध्यमातून धनगर समाजाला प्रस्थापित राजकारण्यांनी हेतूपुरस्कृत आदिवासी आरक्षणपासून दूर ठेवले. यामुळे धनगर समाजावर फार मोठा अन्याय झाला. या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रभर यशवंत सेना करत होती. यशवंत सेनेच्या (१९९३) सरसेनापती पदाची जबाबदारी महादेव जानकरांकडे आली. महादेव जानकरामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रात वादळ निर्माण झाले. सन १९९३ मध्ये महादेव जानकारांनी आपल्या जन्मभूमीत म्हसवड येथे यशवंत सेनेच्या भव्य मेळाव्यात त्रिसुत्री शपथ घेतली की, मी लग्न करणार नाही, मी आजपासून घरादाराचा व पाहुण्यांचा त्याग करेल, मी माझ्या नावावर धन संपत्ती बाळगणार नाही. राष्ट्रीय समाजाला सन्मान सत्ता मिळून देण्यासाठी आजन्म काम करेल.[१३]

महात्मा फुलेंच्या निखळ मानवतावाद, समता विचारांचा वारसा घेऊन लोककल्याणकारी शासक सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमाता महाराणी अहिल्याबाई होळकर तसेच राजश्री शाहू महाराजांच्या आदर्श डोळयासमोर ठेवून महादेव जानकर यांनी राजकारणाला सुरुवात केली. महादेव जानकरांनी १९९८ साली नांदेड लोकसभा निवडणूक लढवली. यशवंत सेनेच्या माध्यमातून सामाजिक जागृतीचे काम सुरु केले. धनगर समाजाबरोबरच इतर समाजाला जागृत व संघटीत केले. व त्यांच्यासमोर समर्थ राजकीय पर्याय उपलब्ध करुन समता मुलक समाजाची निर्मिती करण्यासाठी २९ ऑगस्ट २००३ रोजी राष्ट्रीय समाज पक्षाची स्थापना केली.[१४]

२००६ मध्ये सांगली लोकसभा लढविली. २००९ मध्ये माढा लोकसभा लढविली. तर २०१४ मध्ये बारामती लोकसभेची निवडणुक लढवून सुप्रिया सुळेंना जोरदार टक्कर दिली. २३ जानेवारी २०१५ ला ते पहिल्यांदा महाराष्ट्र विधानपरिषदेवर सदस्य म्हणून गेले. जुलै २०१६ मध्ये त्यांना महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. सन २०१८-२०२४ या कालखंडासाठी ते राष्ट्रीय समाज पक्षाकडून पुन्हा विधानपरिषदेवर नामनियुक्त झाले. त्याग, परिश्रम, समाजाविषयी तळमळ यामुळे महादेव जानकर हे समाजाचे लोकनेते म्हणून उदयास आले.[१५]

धनगर समाजाचा राष्ट्रीय राजकारणातील सहभागाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, पक्षीय राजकारणात सक्रीय असलेले राष्ट्रीय समाजपक्षाचे संस्थापक महादेव जानकर राष्ट्रीय लेबर पार्टीचे अध्यक्ष रणवीरसिंग (नवी दिल्ली) देशीय मकबुल मुन्नेन्न कळघमचे अध्यक्ष सी. मुथूसामी या बोटावर मोजण्याइतके नेते पक्षीय राजकारण करतांना दिसतात. राष्ट्रीय समाज पक्षाने २००९ च्या लोकसभा निवडणुकीत धनगर समाजातील १० जणांना उमेदवारी दिली होती. तर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाजपक्षाने ५ जणांना उमेदवारी दिली होती. त्यापैकी एकही उमेदवार निवडून येऊ शकला नाही. तरी या पक्षाला एकूण ४ लाख ५८ हजार ५८० इतकी मते मिळाली. धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मुद्यावरुन राष्ट्रीय समाज पक्षाने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. अनेक ठिकाणी मोचे, सभा, आंदोलने करुन आपला प्रभाव महाराष्ट्रात निर्माण केला. सन २००९ मध्ये झालेल्या विधानसभेत राष्ट्रीय समाजपक्षाने महाराष्ट्रात २८ मतदार संघातून आपले उमेदवार उभे केले होते. एकूण उमेदवारापैकी २००९ मध्ये या पक्षाला ०.५ टक्के मते मिळाली होती. सन २०१९ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत या पक्षाचे दौंड मतदार संघातून राहुल कुल हे ८७६४९ मते घेऊन विजयी झाले. तर माण मतदार संघातून शेखर गोर हे ५२३५७ मते घेऊन दुसऱ्या क्रमांकावर राहिले. गंगाखेड मतदारसंघातून रत्नाकर गुट्टे यांना १७४७४ मते मिळाली. ते ही दुसऱ्या क्रमांकावर राहिले. तर परांडा मतदार संघातून बाळासाहेब पाटील हे ५२३५७ मते घेऊन तिसऱ्या क्रमांकावर होते. कळमनुरी मतदार संघातून माधवराव नाईक चौथ्या स्थानावर राहिले. २०१४ च्या विधानसभेत राष्ट्रीय समाज पक्षाने दोंड, मान, भूम-परांडा, गंगाखेड व कळमनुरी या जागा लढविल्या होत्या. आपला प्रभाव महाराष्ट्रात निर्माण केला होता. पुढे २०१६- १७ मध्ये महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे १३ नगरपरिषद सदस्य व ७ जिल्हापरिषद सदस्यव १८ पंचायत समिती सदस्य निवडून आले होते.[१६] २०१४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत धनगर आरक्षणाच्या मुद्यावरुन राष्ट्रीय समाजपक्ष व महादेव जानकरांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. त्याचा परिणाम म्हणून फार मोठा समाजवर्ग जानकरांच्या पाठीमागे आला.

**गणपतराव देशमुख :**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील पेनुर या छोट्याशा गावात दि. १० ऑगस्ट १९२७ रोजी एका सधन शेतकरी कुटूंबात मा. गणपराव देशमुख यांचा जन्म झाला.६० शिक्षणाची गोडी अगदी लहानपणापासूनच असल्यामुळे आपल्या वडीलांच्या इच्छेविरुध्द त्यांनी मोठ्या शहरात जाऊन शिक्षण घेण्याला प्राधान्य दिले. आपल्या ५ वीच्या शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी ते जवळच्या गावी गेले. त्यांनी आपले मेट्रीक्यूलेशनचे शिक्षण पंढरपुर येथे पूर्ण करुन आपल्या आईच्या मार्गदर्शनाने पुणे येथील एस.पी. महाविद्यालयात एल.एल.बी. चे शिक्षण पूर्ण केले. राज्यशास्त्र व अर्थशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय होते. १९४२ साली देशाबरोबरच महाराष्ट्रतही स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहू लागले. देशभक्तीच्या भावनेने भारावून जाऊन मा. गणपतराव देशमुख यांनी पेनुर येथील सत्याग्रहात सहभाग घेतला. तुळशीराम जाधव यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी पंढरपुर सारख्या गावात स्वातंत्र्याची चळवळ चालवली. पुढे व्यवसायाच्या निमित्ताने त्यांनी सांगोला या ठिकाणी आपल्या वकिली व्यवसायाने मोठे नाव कमावले. त्यांचे कर्तृत्व, कार्य करण्याची वृत्ती, अभ्यासूपणा, तळमळ व चारित्र्य आदि गोष्टींची नोंद घेत १९६२ साली शेतकरी कामगार पक्षाने त्यांना महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेची उमेद्वारी दिली व ते प्रचंड मतांनी विजयी झाले. त्यांच्या कार्यकाळात केशवराव जेधे, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, बापुसाहेब काळदाते, वसंतराव नाईक व शरद पवार यांच्याशी त्यांचे जिव्हाळयाचे व मैत्रीपूर्ण संबंध होते. तत्वनिष्ठ राजकारण, सहकार, शिक्षण या गोष्टीला जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना सक्षम करण्यासाठी आयुधे समजून त्यांच्या माध्यमातून सामान्यातला सामान्य शेतमजूर कष्टकरी व कास्तकार पुढे कसा जाईल यासाठी अहोरात्र झटणारे झुंजार नेतृत्व म्हणजे आ. गणपतरावजी देशमुख हे होय. इंदिरा गांधी यांच्याशी भेट घेऊन समान कामासाठी समान दाम व स्त्री-पुरुष यांच्यात भेद न करता सर्वांना समान वेतन देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. साने गुरुजी यांनी सुरु केलेल्या पंढरपुर सत्याग्रहातही त्यांनी आपला सहभाग नोंदवला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्येही ते हिरीरीने सहभागी होते. रस्त्यावरचा संघर्ष असो वा सभागृहातील असो, मा. गणपतराव देशमुख यामध्ये हिरीरीने सहभागी असायचे. दुष्काळ निवारण, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेती विकास, ऊर्जा, कृषी उत्पन्नाला रास्त भाव, दारिद्र्य, बेरोजगारी आदि बाबींच्या निराकरणासाठी त्यांनी मुलगामी योगदान दिले.[१७]

महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्याची कामगिरी गणपतराव देशमुख यांनी केली. अकरा (११) वेळा विधानसभेवर निवडुन येण्याचा विक्रम त्यांनी केला. शेतकरी कामगार पक्षाकडून सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या विधानसभा मतदार संघातूनते १९६२ पासून निवडून येतात. १९७२ ते १९९५ या विधानसभेचा अपवाद वगळता ते आजपर्यंत निवडुन आले आहेत. या काळात ते दोन वेळा महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात मंत्री होते. १९७८ मध्ये शरद पवार यांनी पुलोद सरकार स्थापन केले तेव्हा आणि १९९९ मध्ये शेकापने काँग्रेस आघाडी सरकारला पाठींबा दिला तेव्हा अशा दोन वेळा त्यांचा समावेश मंत्रीमंडळात झाला होता. १९६२-६७, १९६७-७२, १९७२-७८ (पो.नि.), १९७८-८०, १९८०-८५, १९८५-९०, १९९०-९५, १९९९-२००४, २००४-०९, २००९-१४, २०१४-१९ या कालखंडात त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून सांगोला मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले.[१८]

**राम शिंदे**

राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे वडील मानकोजी शिंदे व आई सुशिलाबाई शिंदे यांच्या घराण्यातील नववा वंशज म्हणून राम शिंदे संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. राम शिंदे यांचा जन्म ९ जून १९६७ रोजी चोंडी ता. जामखेड, जि. अहमदनगर या ठिकाणी झाला.[१९]

त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरवात ही ग्रामपंचायत पातळीवरुन झाली. सन २०००-२००५ या कालावधीतमध्ये चोंडी, ता. जामखेड, जि. अहमदनगर गावचे सरपंच म्हणून काम केले. पुढे त्यांनी भारतीय जनता पक्षाचे काम केले. त्यामुळे त्यांना या पक्षाने प्रदेश उपाध्यक्ष युवा मोर्चाची जबाबदारी दिली. काही काळ ते भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे चिटणीस होते. भारतीय किसान मोर्चाचे ते सदस्य होते. भाजपा अहमदनगर जिल्हा चिटणीस म्हणून त्यांनी काम केले महाराष्ट्र विधानसभेमध्ये त्यांनी कर्जत-जामखेड मतदार संघाचे प्रतिनिधित्व दोन वेळा केले. सन २००९-२०१४ व २०१४-२०१९ या कालखंडात ते भारतीय जनता पक्षाच्या तिकीटावर कर्जत- जामखेड मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले.[२०]

२०१४ मध्ये महाराष्ट्रात युतीचे सरकार स्थापन झाले. त्यामध्ये त्यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश झाला. ८ जुले २०१६ पासून मृद व जलसंधारण राजशिष्टाचार विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण हे खाते त्यांनी सांभाळले.

**गोपीचंद पडळकर :**

सांगली जिल्ह्यातील आटपाटी तालुक्यातील पडळकरवाडी हे त्यांचं मूळ गाव. हा परिसर दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. पण सध्याच्या काळात डॉक्टरांची वाडी म्हणून पडळकरवाडीची ओळख बनली आहे. धनगर आरक्षणाच्या मुद्द्यावर गोपीचंद पडळकर यांचं नाव महाराष्ट्राला परिचित झाले. फडणवीस सरकारमध्ये मंत्री राहिलेले महादेव जानकर यांचे समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी जानकर यांच्यासोबत मिळून आरक्षण आंदोलनाला बळ दिले.२०१९ च्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपकडून बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांविरुद्ध लढत दिली होती. पण अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात पडळकर यांचं काहीच चालले नाही. त्यांच्यावर या निवडणुकीत डिपॉझिट जप्त होण्याच्या नामुष्की ओढवली होती. निवडणुकीत अजित पवार यांना १ लाख ९५ हजार ६४१ मते मिळाली. तर पडळकर यांना ३० हजार ३७६ मतांवर समाधान मानावं लागलं होते. तर २०१९ एप्रिल-मे दरम्यान झालेल्या लोकसभा निवडणुकीत पडळकर सांगलीतून निवडणुकीस उभे होते. त्यांनी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मिळवत इथं वातावरण निर्मिती केली होती. पण इथंही त्यांना पराभव स्वीकारावा लागले.सांगलीत भाजपचे विजयी उमेदवार संजय पाटील यांना ५ लाख ८ हजार ९९५ मते, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विशाल पाटील यांना ३ लाख ४४ हजार ६४३ तर वंचितच्या गोपीचंद पडळकर यांना ३ लाख २३४ मते मिळाली होती.त्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या कोणत्याही उमेदवारांमध्ये सर्वाधिक मते मिळवण्याची नोंदही पडळकर यांच्याच नावे आहे.याशिवाय २०१४ आणि २०१९ मध्ये पडळकर सांगली जिल्ह्यातील खानापूर मतदारसंघातून रिंगणात उतरले होते.अखेर विधान परिषदेच्या माध्यमातून आता पडळकर यांना भाजप पक्षाकडून आमदारकी मिळाली.[२२] ते धनगर समाजाच्या आरक्षणासाठी लढत आहेत.

**सारांश :**

महाराष्ट्राच्या सत्ताकारणात धनगर समाज महत्त्वाचा घटक मानला जातो.धनगर समाजाची एक व्होट बँक मानली जाते.विविध राजकिय पक्ष ती आपल्याकडे वळीवण्यासाठी प्रयत्नशिल असतात.पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात धनगर समाजाचे नेतृत्वाच विचार करता राजकीय दृष्ट्या सर्वच पक्षात धनगर समाजाचे राजकीय नेतृत्व आहेत. आरक्षण आणि इतर प्रश्न यामुळे धनगर समाज अस्वस्थतेतून राजकीयदृष्ट्या संघटित होत आहे. त्याचं प्रतिबिंब संघटनेच्या मेळाव्यात तसेच आरक्षण चळवळीत दिसत आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीत या समाजातील लोक निवडून येत आहेत. परिणामी हा समाज स्वत:चा सत्तेतील वाटा आज मागत असून स्वत:ची राजकीय ओळख ठसवू पाहतोय. बहुजन समाजातली एक महत्त्वाची जात असलेला हा समाज जागा होणं ही लक्षणीय घटना आहे. समाजाच्या या जागृतीला सोबत घेऊन स्वत:च नेतृत्व अधिक प्रगल्भ करण्याची संधी समाजातील अनेक नेतृत्वाला मिळत असली तरी पश्चिम महाराष्ट्रातील धनगर समाजातील नेतृत्वामध्ये एक संघ पणा अजुही दिसत नाही. यातून समाजातील प्रश्ना बाबत राजकीय प्रभाव प्रभावित पडत नाही.

**संदर्भ सूची :**

1. Cartwright, D. Zander, (1960), A. F. Group Dynamics : Research and Theory, Row,.P.N.46

2. Krech, David , (1962), "Individual in Society: A Textbook of Social Psychology", New York, P.N.89
3. पवार प्रकाश,(२०१४) ,"भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल", डायमंड पब्लिकेशनपुणे ,, पृ.क्र.४
4. Pawar Prakasha,(August 2014), "Social Justices and Caste Organization In Maharashtra as well as Women organization and Hindu Politics in Maharashtra", Research Gate , P.N.2.
5. अमनुसे, नितीनराजे, (२०१८), "पुन्हा एक नवी दिशा", , राजे प्रकाशन, सांगली, पृ.क्र. ४९.
6. कित्ता, पृ.क्र.५०.
7. कोळेकर हरिभाऊ, (२०१४), धनगरांचे राजकारण, अहिल्या प्रकाशन, बार्शी (जि. सोलापूर), पृ.क्र.२२.
8. दैनिक तरुण भारत, दि. ३० जून, २०१२, पृ.क्र.२.
9. नेवरकर पाडुरंग खंडूजी, (२०१९), "धनगर समाजातील आमदारांचा महाराष्ट्र विधानसभेच्या कामकाजातील सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (कालखंड १९९५-२०१४)", पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, पृ.क्र, १४६.
10. महाराष्ट्र टाईम्स, दि. २ ऑक्टोबर, २०१८, पृ.क्र.२.
11. केशरीनागेश, (संपादक), (२०१३), महाराष्ट्र विधानसभा सदस्यांची आडनावानुक्रमे यादी (सन १९३७ ते २०१३), मुंबई, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, विधान भवन, पृ.क्र.७९.
12. कित्ता, पृ.क्र.७९.
13. जानकर, महादेव, (२००९), "बदल आम्ही घडविणार", मुंबई, यशवंत नायक प्रकाशन, पृ.क्र.३.
14. कित्ता,पृ.क्र.३.
15. महाराष्ट्र टाईम्स, दि. २५ ऑक्टोबर, २०१४, पृ.क्र.१
16. कित्ता,, पृ.क्र.१
17. कुंभार, नागोराव, (संपादक), (२०१५), "विचारशलाका", पुणे, नर्मदा ऑफसेट, पृ.क्र.१०७.
18. केशरीनागेश, (संपादक),उपरोक्त,२०१३, पृ.क्र.८१
19. तमनर, विजय, (संपादक), (२०१७), "पिवळं वादळ", राहूरी, गणेश प्रिंटर्स, पृ.क्र.९.
20. केशरीनागेश, (संपादक),उपरोक्त,२०१३, पृ.क्र.१६५
21. महाराष्ट्र टाईम्स, दि. २५ ऑक्टोबर, २०२२